# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी क्र. : (०२२) २२१६ ३९६४ / ६५ / ६९ फॅक्स क्र. : (०२२) २२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. : १९/२०१५-१६

## जाहीर नोटीस

### महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पुर्ततेची पडताळणी करण्यासाठी आयोगाने सुरु केलेल्या कार्यवाहीसंबंधी जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) राज्यातील वितरण परवानाधारकांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी वार्षिक तत्त्वावर करीत असतो. त्यानुसार, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ने सादर केलेल्या माहितीच्या आधारे आयोगाने खालील प्रकरणांमध्ये राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकांच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे व वितरण परवानाधारकांना त्यांच्या सन २०१४-१५ साठीच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेचा तपशील आयोगास सादर करण्याचे निर्देश दिले.

| अनु. क्र. | वितरण परवानाधारक | प्रकरण क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) | सन २०१६ चे प्र. क्र. १६ |
| २ | बेस्ट उपक्रम | सन २०१६ चे प्र. क्र. १७ |
| ३ | दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड | सन २०१६ चे प्र. क्र. १८ |
| ४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड | सन २०१६ चे. प्र. क्र. १९ |

त्यानुसार महावितरण वगळता इतर वितरण परवानाधारकांनी सविस्तर माहिती आयोगास सादर केली असून या माहितीची एक प्रत आयोगाच्या **www.merc.gov.in / www.mercindia.org.in** या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

वितरण परवानाधारकांनी व महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि हरकती लेखी मागवित असून त्या सहा (१+५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४००००५ (फॅक्स:०२२-२२१६३९७६, ई-मेल: **mercindia@merc.gov.in**) या पत्त्यावर **दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

सदर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविणाऱ्याने त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून **दि. २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणींच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

सही/-
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

ठिकाण : मुंबई
दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१६